# यांचेशिवाय नमस्कार तो कोणाला करायचा ?
# कविकुलमण्डन श्री. मोरोपंत पराडकर

"सुश्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।।
ओवी ज्ञानेशाची, किंवा आर्या मयूरपंतांची ।।"

मराठी काव्यविश्वाचा पाया ज्यांच्यामुळे सांगता येतो; असे हे चार महाकवी ! आणि त्यांच्या अविस्मरणीय कृती ! 'वामन पंडितांचा **श्लोक**, तुकाराम महाराजांचा **अभंग**, ज्ञानेश्वर महाराजांची **ओवी** आणि मयूरपंतांची **आर्या** !!' हे मयूरपंत म्हणजे मोरोपंत पराडकर ! पन्हाळगडावर जन्म व शिक्षण, आणि बारामती कर्मभूमी! इ. स. १७९४ मध्ये मृत्यू. गुणिजनांचे कौतुक केले तर मी छोटा ठरतो म्हणून की काय न कळे; कौतुक राहो, कारण ते करण्यासाठी मने पूर्वग्रहदोषापासून मुक्त असावी लागतात आणि गुण समजण्यासाठी त्या कवीच्या उंचीवर थोडेसे तरी यावे लागते. मोरोपंतांना कवी म्हणणेही योग्य नव्हते, असे कांही व्याख्यानामधून भडकपणे बोलणाऱ्यांनी बोलून, लेखांमधून सुचवून पाहिले. असे करणाऱ्याला लोक बुद्धिमान समजतात अशी कल्पना नव्हे, खात्री झालेल्या लोकांनी बेलगाम बोलून-लिहून पाहिले. पेशव्यांनी तर म्हणे त्यांच्या आर्या कीर्तनांत म्हणायला बंदी घातली होती; दुसऱ्यावर टीका भडकपणे केल्याने मी मोठा ठरतो, या जाणिवेची रोगबाधा एकेकाळी आम्हालाही झाली होती. पण त्यामध्ये आपली टोळी नव्हे, एक गँग करण्याचे कडक पथ्य पाळावे लागते, आणि त्या गँगचे मेंबर्स प्रसिद्ध शहरांतून असलेले, तसेच प्रसिद्ध असावे लागतात. ते पाळायचे राहिले म्हणून आम्ही विचारवंत, प्रतिभावान टीकाकार वगैरे बिरुदावलीला मुकलो !

इ. स. १९९४ साली मोरोपंतांना स्वर्गस्थ होऊन दोनशे वर्षे पूर्ण होतात म्हणून 'पंढरपूर' येथे केवळ मोरोपंत व त्यांचे 'साहित्य' याच विषयावर तीन दिवसांचे चर्चासत्र श्री. नारायण वासुदेव उत्पात या पंढरपूरच्या सहृदयोत्तम रसिकाने स्वखर्चाने केले. जबरदस्त प्रतिभाशाली, अर्थवाही शब्दयोजनेच्या बाबतीत भारवी व माघ-कवींसारखा निपुणतम कवी, ओजस्विता, माधुर्य आणि प्रसन्नता या काव्यगुणांची उधळण करण्यात सिद्धहस्त असा पहिला कवी-हे मत व्यक्त केलेय डॉ. ना.गो. नांदापूरकर या ख्यातनाम विद्वानानी मोरोपंतांना निष्प्रभ करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कृष्णशास्त्री चिपळूणकर, पु.ग.सहस्त्रबुद्धे यांच्यासारख्यांचे प्रयत्न-प्रा. एम.के. सावकार, विष्णुशास्त्री चिपळूणकर, प्रा. एम.एन. आचार्य, प्रा. म. ना अदवंत, प्रो. वा. गो. मायदेव, प्रा. पटवर्धन, डॉ. नांदापूरकर अशांसारख्या डझनावरी लोकांच्या कौतुकामुळे अस्तंगत झाले आणि मोरोपंत निखालसपणे महाकवि होते हे सिद्ध झाले.

स्वयंभू गुणांच्या ताकतीवर महान ठरलेल्या गुणी लोकांचे गुण आपल्यामध्ये नाहीत, ते उत्पन्न होणे शक्यही नाही. त्याला लागणारी अंत:करणाची परसंवेदना-कुशल अशी ती मानसिकता, ती स्वच्छ बुद्धी, तिची उंची, झेप आपल्या जवळ येणे शक्य नाही; याची पुरती जाणीव झाली, की काही व्यक्तींना स्वभावत: दु:ख होते. त्याची परिणती द्वेषात होते. हा द्वेष पुष्ट व्हायला भोवतालची अनेक क्षेत्रातली सदृश परिस्थिती सुद्धां कारण ठरते. ज्याच्या संबंधी असा परंपरा-पुष्ट द्वेष, त्यांचेकडून आपले नुकसान काहीही होणार नाही याची खात्री झाल्यावर, जमल्यास त्या द्वेषाला संस्थात्मक स्वरूप देऊन सुद्धा गुणी व्यक्तीला खाली ओढण्याचे प्रयत्न होतात. त्यासाठी अनेक युक्त्या-प्रयुक्त्या अशा बुद्धिमानांजवळ तयार असतात. खरे म्हणजे, मुक्तेश्वरांपासूनचे हे चारही कवी आद्यकवी म्हणण्याच्या योग्यतेचे पण त्यांना आद्यकवि ठरवायचे नव्हते म्हणून केले काय ? मुक्तेश्वर, पं. रघुनाथ वामन पंडित, मोरोपंत यांना 'पंडित कवीच्या' श्रेणीमध्ये टाकले. संत श्री ज्ञानेश्वर महाराज, संतश्री तुकाराम महाराजांपासून अनेकांचे रसाळ काव्य खूप आधीचे पण त्यांना 'संत कवि म्हणून टाकले. शाहीर कवींना तुणतुणे मदतीला घेणारे म्हणून 'तंत-कवि' केले. पंडित कवींमध्ये 'मोरोपंत'च मुख्य टार्गेट होते म्हणून त्यांना 'पंत कवि' ठरविले. त्यांना पंडित कवीही म्हटल्यामुळे त्यांचेविषयी अभिमान असलेले आत्मीयता असलेले जरासे सुखावले असतील. ! पण

ती मोट बांधली 'पंत-संत-तंत' नावाची गांठ मारून कोपऱ्यात ठेऊन देण्यासाठी. कारण मराठीचा पहिला कवि त्यापैकी कोणालाही ठरवायचे नव्हते. गणित पक्के होत असावे व पंडित-कवि म्हटले की सामान्य जनतेच्या कल्याणाचा वसा घेतलेले सरकार, त्याला शंभर किलोमीटर दूर ठेवेल याची खात्री होतीच तसेच झाले. मोरोपंतांचे वेचे मराठी टेक्स्ट बुकांतून हद्दपार झाले. मोरोपंत आमचे नव्हते; आणि त्यांचे बाजूने बोलणारा कोणी प्रभावी असा नृपांगणापर्यंत पोचलेला नव्हता- शासकीय व्यवस्थेला कमिटीचा फायदा घेऊन वळविणे सोपे होतेच.

या अशा गोष्टी घडवून आणण्यासाठी केवढा दीर्घ प्रयत्न ! ह.भ.प. पांगारकरांनी 'मोरोपंत'-'व्यक्ति आणि कार्य' या पुस्तकामध्ये पेशव्यांनी, कीर्तनकारांवर मोरोपंतांच्याा आर्या म्हणण्यावर बंदी घातली होती असे लिहिले आहे. कांही कीर्तनकार तो हुकूम आजही पाळतात म्हणे ! आणि तरीही जन-सामान्यांमध्ये आणि सुजाण नागरिकांमध्येही वामन पंडित, मोरोपंत, संत तुकाराम,संत ज्ञानेश्वर, जनाबाई यांचेएवढे लोकप्रिय कवि दुसरे भेटत नाहीत. पहिले म्हणून ठरविलेल्या व्यक्तींचे काव्य लोकप्रिय दिसत नाही.

व्यक्तीमधले उत्तमोत्तम जर कलारूपाने बाहेर आले तर तेच एवढे सशक्त असते की ते शेकडो वर्षे स्वत:चे रक्षण करायला समर्थ असते. भोवती उसने अवसान आणणारे गँगवाले आणि माध्यमांच्या साह्याने शासकीय मदतही जरी सोबतीला आली; तरी सर्वसामान्य जनतेजवळ बरे-वाईट कळण्याची स्वयंभू कुवत असते. आणि याचमुळे ज्याचं काव्य-साहित्य विचार टिकले, लेकप्रिय झाले त्यामध्ये हीच 'संत-पंत-तंत' मंडळी प्राथम्य मिळवून होती. पहिली होती. मोरोपंत आजही झळाळतात ते याचमुळे. स्वत: मोरोपंत आपल्या काव्याविषयी अभिमानाने म्हणतात-

'श्रीमन्मयूर कविची देते सन्तोष मानवा कविता ।
असता जरि भूमीवरि सुरगुरु तरि तोहि मान वाकविता'।।

'देवांचा गुरु बृहस्पती जरी या पृथ्वीतलावर असता तरी त्याने आपली मान या कवितेपुढे वाकवली असती'!!

रामायण-महाभारतादि महाकाव्ये त्यांनी आर्यांमध्ये आणली रामायणावर त्यांचा विशेष लोभ ! एकशे आठ रामायणे त्यांनी आर्यामध्ये रचली. आर्या या मात्रावृत्ताचे ऐश्वर्य त्यांनी चिरस्थायी केले. त्यांचे व्याही धर्मसिंधुकार बाबाभट्ट पाध्ये यांनीही त्यांचे कौतुक आर्यावृत्तामध्ये केले. एकशे आठ रामायणातले एक 'निरोष्ठ रामायण' म्हणजे अशी रचना कीं, ज्यामधे ओठाला ओठ लागेल असा एकही वर्ण त्या काव्यात नाही. 'प-फ-ब-भ-म' हे वर्ण या काव्यात नाहीत. 'राम' या शब्दातच 'म' हा ओष्ठ्य वर्ण आहे. कसें जमले असेल त्याना ? गुणांनी सर्वश्रेष्ठ ! प्रतिभा विलास आश्चर्यचकित करणारा ! संख्या लाखाज़वळ !

'रमणीय अर्थाचे प्रतिपादन करणारा शब्दही काव्य ठरतो'... मोरोपंत असे शब्दसम्राट होते. उत्तम काव्याची सर्व लक्षणे त्यांच्या काव्यांत दिसतात. रामणीयक अर्थाचे वहन करणाऱ्या शब्दांची संपत्ती केवढ्या मोठ्या प्रमाणांत खऱ्या मोठ्या कवीजवळ असू शकते, त्याचे प्रदर्शनीय उदाहरण त्यांच्या आर्यांमधून दिसते. त्यांची रचना सरळ-साधी-सोपी-त्याच वेळी चिरपरिणामकारक असूं शकते याचं उदाहरणच पहाना.. !

"सुसंगति सदा घडो सुजन वाक्य कानी पडो,
कलंक मतिचा झडो विषयसर्वथा नावडो ।"

हे असं सहज-सहज लिहून जाणारे मोरोपंत, त्यांच्यामधले उत्तमातले उत्तम सत्त्व काढून, आमच्या कविता खजिन्यासारखे ठेऊन जातायत असे वाटत राहते.

त्यांच्यावर आदरयुक्त प्रेम करणाऱ्या श्री. निंबाळकर नांवाच्या मराठा ज्ञातीच्या गृहस्थांनी, मोरोपंतांना काशी यात्रा घडवून आणली. रस्त्यांत त्यांना चोरा-चिलटांपासून त्रास होऊ नये म्हणून चार-पाच संरक्षक हत्यारी घोडेस्वार त्यांचे बरोबर दिले होते. प्रोफेसर वा. गो. मायदेव यांनी मुंबई विद्यापीठाला पंचवीस हजार रु. मोरोपंतांचे सर्व काव्य प्रसिद्ध व्हावे म्हणून दिले. ज्या काळात सोने ऐंशी रु. दहा ग्रॅम होते. बारामतीला पेशवा गेला असता, मोरोपंताना, त्याने स्वत:च्या मनोरंजनासाठी कीर्तन करण्याचा हुकूम दिल्यावर 'मोरोपंत आत्मिक सुखासाठी- मनांत येईल तेव्हा कीर्तन करतो-हुकूमाची ताबिली

करण्यासाठी नाही. हे असे उद्दाम शासकाला तोंडावर ठणकाऊन सांगणारा-शेकडो वर्षातून एकदाच जन्मणारा मानी कवि मोरोपंत पराडकर होतो. अशांना विकत घेणे कोणाला जमत नाही ! माध्यमांचे साह्य घेऊन वाकविणे तर शक्यच नाही.

त्यांचे उपदेशात्मक काव्य, आपल्या प्रिय पत्नीच्या पैठणीवर लिहून घेणारा श्री. निंबाळकरांसारखा सहृदय सम्राट रसिकवर त्यांना भेटला असा हा सर्वश्रेष्ठ विचारवंत, मनीषी कवि-त्यांचे उत्तम विचार सदैव डोळ्यांसमोर रहावेत एवढीच इच्छा निंबाळकरांची होती. काय होता तो श्लोक?

''गांजा ओढु नको, सुरा पिऊ नको, तूं भांग घोटूं नको,
गोळी खाऊ नको, अफू पिऊ नको, वेश्येसि पाहू नको ।
कांही चोरू नको, उगा फिरु नको, तूं धीर सोडु नको,
विद्या-ज्ञान-कला-धना मिळविल्यावाचून राहू नको ।।

इंग्लिश भाषांतरासाठी माझ्याकडे आलेला तो जुन्या-पुराण्या पैठणीचा तुकडा आजही माझ्या डोळ्यांसमोर नाचतोय. निंबाळकरांसारखे शासक मिळाले असते तर शासकाच्या अंगणात व शासकीय इमारतीत दुष्टाव्याच्या अनेक पुड्या घेऊन येणाऱ्या सोंगा-ढोंगाना प्रवेशच मिळाला नसता असे वाटत रहाते.

तीर्थरूप मोरोपंतजी, जोपर्यंत मराठी भाषा जिवंत आहे, निरामय रसिकतेला कोणत्याही अहंकाराचे ग्रहण जोपर्यंत लागले नाही. तोपर्यंत तुमची आर्या आणि तिचे जनक तुम्ही. मराठी शारदेला, शारदीय चंद्रासारखे आहात. तुमच्याशिवाय नमस्कार तो कोणाला ?

(१) अधिक माहितीसाठी न कंटाळता इंग्लिश वेबसाईट पहावी www.thekarhaadaa.org

(२) पुढील अंकात नमस्कार योग्य व्यक्ती-**झाशीची राणी लक्ष्मीबाई !**

**अवधूत हर्डीकर, पुणे**